**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ८३/२०१८-१९/११८ दिनांक: २५/०६/२०१९

**आदेश**

**आदेश केस क्र. ८३(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | श्री दिनकर शंकर पोवार ,<br>मु.पो. शिये (हनुमानगर) ता. करवीर<br>जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग कदमवाडी | |

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.के. ताडे, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

आज दिनांक ०४.०४.२०१९ रोजीर सदर केसची सुनावणी या मंचासमोर घेण्यात आली यावेळी तक्रारदार श्री दिनकर शंकर पोवार हे उपस्थित होते. तसेच वि.वि.कंपनी कडून श्री रानभरे कार्यकारी अभियंता व उपकार्यकारी अभियंता श्री वि.वि. सपाटे ग्रामिण विभाग-एक कोल्हापूर हे उपस्थित होते.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

तक्रारदार श्री दिनकर शंकर पोवार, मु.पो. शिये(हनुमानगर) ता. करवीर जि. कोल्हापूर यांचे थोडक्यात म्हणणे असे की, त्यांची शिये येथे वडिलोपार्जित शेत जमीन सर्व्हे क्र. २६९/२ असून त्यामध्ये त्यानी बोअरवेल मारलेला आहे. शेत जमीनीमध्ये पाण्यासाठी बोअरवेल मारल्याबाबतचा दाखला तलाठी कार्यालयाकडून त्यांना दिनांक ३१.०५.२०१३ रोजी मिळाला . त्यानंतर तक्रारदारानी बोअरवेल पंपासाठी वीज कनेक्शन मिळावे म्हणून दिनांक ११, जून २०१३ रोजी वि.वि.कं.कडे रीतसर अर्ज दिला अर्ज दिल्यानंतर शिये येथील कार्यालयामार्फत कनिष्ठ अभियंता एम.वाय. ताकसांडे प्रत्यक्ष जागेवर जावून सर्व्हे करुन तसा अहवाल क्र. JE/SHIYE/541 दिनांक 13.07.2013 रोजी वरीष्ठाना पाठवला, तक्रारदारांना सुमारे तीन महिन्यानंतर दिनांक २१.१०.२०१३ रोजी उपविभाग ग्रामिण-१ बापट कॅप, कोल्हापूर यांचेकडून सअ/ग्रा-१/ता/ साप्रवि/ लेखा/ ३२३३ या पत्रानुसार रु. १७५०/- भरण्याचे सांगण्यात आले. तक्रारदारानी त्यानुसार दिनांक १९.११.२०१३ रोजी रु. १७५०/- भरले. त्यानंतर तक्रारदारांना २६६६००१०१६६८ हा ग्राहक क्रमांक मिळाला . तेव्हा पासून आज अखेर पर्यन्त त्यांना वीज कनेक्शन मिळाले नाही. तक्रारदारानी अनेक वेळेला लेखी तोंडी विविध स्तरावरील अधिका-यांना प्रत्यक्ष भेटून वारंवार पाठपुरावा करुन देखील वीज कनेक्शन मिळालेले नाही.

वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता तक्रारदारांना वीज कनेक्शन मिळण्यास दिरंगाई झाल्याचे स्पष्ट होत आहे. तरी याबाबत निश्चित दिनांकाचे आत कनेक्शन देणेचा व नुकसान भरपाई देणेची मागणी केलेली आहे. याबाबतचे लेखी म्हणणे व इतर कागदपत्रे तक्रारदारांनी सादर केलेली आहेत.

याबाबत वि.वि.कंपनीचे म्हणणे असे की, तक्रारदाराने गट क्र. २६९/२ शिये मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंप कनेक्शनसाठी मागणी केली होती व अर्जानुसार AE/R1/JELS/SPA/SHIYE /06/13-14 अन्वये त्यांना भार मंजूरी AE/R1 /SPA / SHIYE /27/12-13 नुसार ०.३ कि.मी. उच्च दाब वाहिनी १०० केव्हीए रोहित्र व०.३ कि.मी. लघुदाब वाहिनी या अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण झालेनंतर कनेक्शन देण्याच्याअटीवर देण्यात आली होती. त्यासाठी आवश्यक सुरक्षा ठेवेचा भरणा १९.११.२०१३ रोजी श्री पवार यांनी केलेला आहे.

इन्फ्रा २ योजने अंतर्गत सन-२०१३-१४ या कालावधातील पैसे भरुन प्रलंबित ग्राहकांना विद्युत पुरवठा देणेसाठी लागणा-या आवश्यक विद्युत वाहिनी व इतर काम ठेकेदारास काम करणेसाठी सुपूर्द करणेत आले होते. त्यानुसार इन्फ्रा.२ योजनेंतर्गत AE/R1/JELS/SPA/SHIYE /27/12-13 नुसार रोहित्राचे काम पूर्ण करताना अडथळा आलेमुळे सदर रोहित्र अंदाजपत्रकानुसार थोडया दूर अंतरावर रोहित्राचे काम पूर्ण झाले त्यामुळे श्री दिनकर शंकर पोवार यांना विद्युत पुरवठा करणेसाठी ०.६ कि.मी. इतकी लघुदाब वाहिनीचे नवीन काम करणे आवश्यक होते. सदर कामाचे अंदाजपत्रक सहाय्यक अभियंता शिये यांनी दिनांक ०१.०२.२०१७ रोजी या

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

कार्यालयास पाठविले होते. त्यामुळे श्री दिनकर शंकर पोवार यांना AE/R1/JELS/SPA/SHIYE / INFRA / KAR / EST/27/12-13 अन्वये नवीन सुधारित ०.६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे अंदाजपत्रक मंजूर करुन इन्फ्रा.२ योजनेतंर्गत काम करणेस ठेकेदारास काम करणेस देण्यात आले होते.

तसेच श्री पोवार यांना आवश्यक ०.६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम ठेकेदारामार्फत करताना कामात ३ ते ४ वेळा अडथळा आला होता. अडथळा दूर करणेसाठी पूर्ण प्रयत्न महावितरण मार्फत करणेत आले व त्याची पूर्ण कल्पना तक्रारदारास होती. परंतु सदर काम पूर्ण होऊ शकले नाही.

DIRECTOR (PROJ) /SE/(PLG)/AG HVDS/8979/20-04-2018 नुसार प्रलंबित शेती पंप ग्राहकांना विद्युत पुरवठा करणेसाठी डीपीआर करणेसाठी प्राप्त झाले त्यानुसार श्री पोवार यांना विद्युत पुरवठा करणेसाठी पुनश्च: सर्व्हे करुन ०.५४ कि.मी. उच्च दाब वाहिनी व १० के.व्ही.ए. रोहित्राचे काम एचव्हीडीएस डीपीआर मध्ये प्रस्तावित करणेत आलेले आहे. तसेच सदर यादी मध्ये श्री दिनकर शंकर पोवार यांना दिनांक १९.११.२०१३ रोजी पैसे भरणा केल्यामुळे सेवा जेष्ठतेनुसार अनु.क्र.१ ला त्यांचे नावे असून वरील प्रमाणे एचव्हीडीस योजनेतंर्गत काम पूर्ण झालेनंतर त्यांना कनेक्शन देता येईल.

वरील सर्व बाबींचा व सुनावणी दरम्यान झालेल्या युक्तीवादाचा विचार करता मंचाच्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | तक्रारदारांची मागणी मंजूर करता येईल काय? | होय |
| २ | तक्रारदाराला नुकसान भरपाई देता येईल काय? | होय |
| ३ | अंतिम आदेश? | खालील प्रमाणे |

९) आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## कारणमिमांसा

१०) **मुद्दा क्रमांक १ व २ :-** तक्रारदाराने ११ जून २०१३ रोजी ३ अश्वशक्ती शेती पंप कनेक्शनसाठी वीज मागणी केली होती त्यानंतर वि.वि.कं.च्या अधिका-यांनी तक्रारदाराच्या प्रत्यक्ष जागेवर सर्व्हे करुन तसा अहवाल १३ जुलै-२०१३ राजी वरीष्ठ कार्यालयाला पाठवला होता. दिनांक ३१.१०.२०१३ सअ/ग्रा१/ता/साप्रवि/लेखा/३२३३ च्या पत्रानुसार तक्रारदारानी दिनांक १९.११.२०१३ रोजी मागणी प्रमाणे रु. १७५०/- वि.वि.कं.कडे भरलेले आहेत. तशी पैसे भरल्याची ०७४०४५६ या नंबरची सीसीटची ग्राहकांनी सुनावणी दरम्यान मंचासमोर उपस्थित केली. याबाबत वि.वि.कं.चा कोणताही उजर नसून वि.वि.कं.ला ही बाब स्पष्टपणे मान्य आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

सदर तक्रारदाराला वीज कनेक्शन देण्यासाठी वि.वि.कं.ने सन-२०१३-१४ च्या कालावधीतील पैसे भरलेल्या प्रलंबित ग्राहकांना इन्फ्रा.२ योजने अंतर्गत विद्युत पुरवठा करण्यासाठी लागणा-या आवश्यक विद्युत वाहिनी व इतर सर्व काम करण्यासाठी ठेकेदारास देण्यात आले होते. परंतु वि.वि.कं.च्या म्हणण्यानुसार रोहित्राचे काम पूर्ण करताना काही अडथळे आले ते अडथळे दूर करण्यास वि.वि.कं.ला वेळ लागल्यामुळे तक्रारदारांना विज कनेक्शन देण्यात आले नाही. परंतु सुनावणी दरम्यान वीज कनेक्शन देण्यासाठी चालू असलेल्या कामामध्ये आलेल्या अडथळया बाबतचे कोणतेही पुरावे वि.वि.कं.ने सादर केले नाहीत. तथापी अडथळे आल्याचे जरी वादाकरिता मान्य केले तरी प्रत्यक्ष काम करीत असताना मुख्य अडथळे आणणा-या तेथील हनुमान विकास सेवा संस्था या सोसायटीकडून तक्रारदाराने रोहित्र बसविण्याबाबत आपली हरकत नसलेबाबतचे ठरावपत्र घेवून ते वि.वि.कं.कडे दिलेले होते. वास्तविक वीज कनेक्शन देत असताना येणारे अडथळे दूर करण्याचे काम हे महावितरणचे असते. किंबहूना त्यांना तसेच विशेष अधिकार असल्याचे कायद्यामध्ये प्रावधान आहे. तरीही तक्रारदाराने वीज कनेक्शन मिळाण्यामध्ये उशीर नको म्हणून मुख्य अडथळा करण्या-या संबंधित सोसायटीकडून ना हरकत चा ठराव घेवून वि.वि.कं.ला दिलेला होता.

कृती मानकांचा विचार करता वीज जोडणी देण्याकरिता झालेल्या विलंबा बाबत कोणतेही सबब, कारण किंवा प्रशासकीय अडचणी हयांचा विचार करुन विहीत मुदतीत काही सवलत देण्याचे प्रावधान नाही. त्यामुळे वि.प. कंपनीने सांगितलेल्या कोणत्याही सबबीचा विचार करता येणार नाही. असे या मंचाचे स्पष्ट मत आहे. तक्रारदाराला त्याने अर्ज दाखल केल्यापासून कृती मानकांनुसार एका विशिष्ट मुदतीत नविन वीज जोडणी मिळण्याचा कायदेशीर हक्क आहे. तो हक्क कोणत्याही सबबी खाली नाकारता येणार नाही. सबब तक्रारदाराची तक्रार मंजूर करुन त्याला एका विशिष्ट कालावधीमध्ये नविन वीज जोडणी देण्याचा आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग(वितरण परवाना धारकांचा कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनिमय २०१४ अनुसार तक्रारदारास अर्जाच्या तारखेपासून ३ महिन्याच्या आत नविन वीज जोडणी आवश्यक असून झालेल्या विलंबाकरिता भरपाई देण्याचा आदेश पारीत करणे आवश्यक आहे. असा या मंचाचा निष्कर्ष आहे.

सबब वरील मुद्दा क्र. १ व मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी देवून आम्ही खालील अंतिम आदेश पारीत करीत आहोत.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) तक्रारदारास वि.वि.कं.ने हया आदेशाच्या तारखेपासून ३०दिवसाच्या आत नविन वीज जोडणी द्यावी.
३) वीज मागणीचा अर्ज दिलेल्या तारखेच्या तीन महिनपासून म्हणजे.दिनांक ११.०९.२०१३ पासून हया आदेशाच्या तारखेपर्यन्त म्हणजे दिनांक ०४.०४.२०२०१९ पर्यन्त २८७ आठवडयांच्या विलंबाकरीता प्रति आठवडा रु. १००/- प्रमाणे एकूण रक्कम रु. २८,७००/- (रु. अठ्ठावीस हजार सातशेहे) इतकी नुकसान भरपाई हया आदेशाच्या तारखेपासून एक महिन्यात द्यावी.

GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

४) आदेशाची पुर्तता झाल्याचे हया आदेशाच्या तारखेपासून ४५ दिवसांत या मंचाला लेखी कळविण्याचे आहे.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (एन.के. वार्डे) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

वरील निकालाशी मी सहमत नसून, माझे स्वतंत्र मत मी देत आहे.

15/06.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

मी नरेंद्रकुमार काकासो ताडे, सदस्य,सचिव वरील निर्णयाशी सहमत नाही. माझा स्वतंत्र न्याय निर्णय खालील प्रमाणे देत आहे. तो या निकालाचा भाग समजण्यात यावा. **(वेगळे मत देण्यात आलेले आहे)**

तक्रारदारांच्या मागणी अर्ज दिनांक ११.०६.२०१३ चा आहे. तक्रारदारांने वि.प. विज वितरण कंपनीकडे दिनांक १९.११.२०१३ रोजी कोटेशन प्रमाणे रक्कमेंचा भरणा केला आहे.

१) तक्रारदारांने तक्रार अर्जात वि.प. कंपनीकडे विज पुरवठा करण्यासाठी विद्युत खांबाची उभारणी केले असलेचे मान्य केलेले आहे. परंतु विद्युत वाहिनी जोडत असताना कामात आलेल्या अडथळयामुळे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे वि.प. विज वितरण कंपनीने काम करण्याचा प्रयत्नच केला नाही असा अर्थ होत नाही. अडथळा आलेने काम पूर्ण झाले नाही. काम पूर्ण करुन घेणेसाठी व अडथळे दूर करणेसाठी तेवढीच जबाबदारी तक्रारदारांची होती .त्यामुळेविज पुरवठार करणेस झालेल्या विलंबास सरसकट वि.प. विज वितरण कंपनीला जबाबदार धरणेत आले आहे हे मला मान्य नाही.

२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतीचे मानके) विनियम २०१४ नियम क्र. ४.८ नुसार विज पुरवठा करताना वाहिनीचा विस्तार करावा लागत असलेस तक्रारदारांने कंपनीकडे भरणा केलेल्या रक्कमेच्या तारखेपासून तीन महिन्याच्या अंत विद्युत पुरवठा करणेचा आहे. तक्रारदारांने कंपनीकडे रक्कमेचा भरण दिनांक १९.११.२०१३ रोजी केला आहे. या तारखेपासून तीन महिने दिनांक १९.०२.२०१४ रोजी होतात. म्हणजेच वि.प. विज वितरण कंपनीस भरपाई दिनांक ११.०९.२०१३ पासून न लावता ती दिनांक १९.०२.२०१४ पासून लावणे जरुरीचे होते मंचाकडून न्याय देताना अशा चूका होणे योग्य वाटत नाहीत.

३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग आदेश क्र. १९/२०१९ चे सुधारित आदेश क्र. १०२/२०१९ दिनांक २०.०५.२०१९ नुसार सर्व शेतीपंप विज ग्राहकांच्या विद्युत पुरवठा देणेसाठी झालेल्या विलंबास ग्राहकाने भरलेल्या सर्व्हिस कनेक्शन चार्जेसच्या दुप्पट म्हणजेच या तक्रारीत रु. १००/- भरपाई म्हणून वितरण परवाना धारकास लावणे गरजेचे होते त्यामुळे सदर मंचाने दिलेला निर्णय मला मान्य नाही व त्या निर्णयाशी सहमत नाही.

15/06

दिनांक : १५.०६.२०१९

( नरेंद्रकुमार का. ताडे)
सदस्य सचिव ग्राहक
तक्रार निवारण मंच कोल्हापूर

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण